REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख १४ फेब्रुवारी, १९४० अंक ७

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

### दुसरी आवृत्ति तयार झाली.

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकासहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

अप-टु-डेट शिलाईकरितां

महिंद्रकर ब्रदर्स

यांचेकडे चौकशी करा.

१२ तासांत कपडे शिवून मिळतील.

बुधवार चौक, पुणें

खादी भांडाराचे माडीवर

# विविध माहिती

### हिंदी साखरेचे कारखाने

हिंदी साखरेच्या धंद्यावर आज सुमारें २ कोटि शेतकरी अवलंबून असून त्या धंद्यांत सुमारें ३० कोटि रुपये भांडवल गुंतलेलें आहे. १ लक्ष लोकांस साखर कारखान्यांत काम मिळत असून त्यांपैकी १½ हजार शास्त्रीय पदवीधर आहेत.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. १३ आ. ९ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं, गेल्या आठवड्यांत, एक कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. १३ आ. ९ पै इतका पडला.

### खासगी रीतीनें पत्रें नेऊं नका

तिकिटें न लावलेलीं, आफ्रिकेस पाठवावयाचीं खासगी पत्रें आपल्याबरोबर नेऊं नका, अशी सूचना पॅसेंजर्स ॲन्ड ट्रॅफिक रिलीफ असोसिएशन, मुंबई, ह्या संस्थेनें हिंदुस्थानांतून आफ्रिकेकडे जाणाऱ्या उतारूंस केली आहे. अशीं पत्रें नेणें पोस्टाच्या कायद्याविरुद्ध आहे आणि सध्याच्या युद्ध परिस्थितींत त्याबाबत कडक उपाय योजले जातील.

### मुंबई प्रांतांतील उसाचें पीक

१९३९ च्या मोसमांतील मुंबई प्रांतामधील उसाच्या पिकाचा सरकारी अंदाज खालीलप्रमाणें आहे:—

| | |
|---|---|
| पिकाखालील जमीन | १,२९,००० एकर |
| | (गेल्या वर्षापेक्षा १३·८% अधिक) |
| गुळाचें उत्पादन | ३,२६,००० टन |
| | (गेल्या वर्षापेक्षा १८·९% अधिक) |

### पृष्ठभागाखालील पाण्याची पातळी

सक्करच्या धरणाखालील जमिनीचे पृष्ठभागाखालील पाण्याची पहाणी करण्याच्या एका योजनेस इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चनें २४,२०० रुपयांची ग्रँट मंजूर केली आहे. पृष्ठभागाखालील पाण्याची पातळी वर येत आहे, ती शेतीस अनिष्ट असल्यानें त्या संबंधांत संशोधन होणें आवश्यक आहे.

### पोस्टल लाइफ इन्शुअरन्स

गेल्या वर्षी पोस्ट आणि तार खात्यानें ९६½ लक्ष रुपयांच्या ५ हजार विमा पॉलिसी दिल्या. त्यापूर्वीचे वर्षी ४,२९४ पॉलिसी दिल्या होत्या, त्यांची किंमत ८९½ लक्ष रुपये भरली होती. गेल्या वर्षी हप्त्यांचें उत्पन्न सुमारें ८० लक्ष रुपये झालें.

### रिझर्व्ह बँकेची इमारत

रिझर्व्ह बँकेनें ६ लक्ष रुपये खर्चून लाहोर येथें आपल्या शाखेकरितां एक इमारत बांधली आहे.

### २७ प्रश्न

१९४१ च्या शिरगणतीचे वेळीं प्रत्येकास लिंग, वय, जन्मभूमि, विवाहित, अविवाहित, का विधवा इत्यादि सुमारें २७ प्रश्नांची उत्तरें द्यावीं लागतील.

### फाजील नफ्यावरील कर आणि संस्थानी हद्दींतील कंपन्या

फाजील नफ्यावरील कर हा ब्रिटिश हिंदुस्थानांतील कंपन्यांसच लागू असल्या कारणानें, संस्थानांतील कंपन्यांच्या भागांस यापुढें जोगती मागणी येण्याचा संभव आहे. अर्थात, संस्थानांनींहि ह्या करवाढीचें अनुकरण केलें, तर संस्थानी हद्दींतील कंपन्यांस मिळणारी सवलत नाहींशी होईल.

### त्रावणकोर बँकेच्या ठेवीदारांस डिव्हिडंड

ब्रिटिश हिंदुस्थानांतील ज्यांचें त्रावणकोर बँकेकडून येणें ५० रुपयांपेक्षा कमी होतें, अशांना मद्रास हायकोर्टानें रुपयांत आठ आणे डिव्हिडंड मागेंच मंजूर केलें होतें. ज्यांचें येणें ५० रुपयांपेक्षां अधिक होतें, अशांना ३ आणे डिव्हिडंड मागें दिलें होतें. २ आण्यांचें दुसरें डिव्हिडंड त्यांस आतां देण्यांत आलें आहे आणि त्याप्रमाणें मद्रास हायकोर्टानें त्रावणकोर नॅशनल ॲन्ड क्विलॉन बँक लि. च्या ऑफिशिअल लिक्विडेटरला हुकूम केला आहे.

### हिंदी रेल्वेजचा नफा

हिंदुस्थान सरकारच्या मालकीच्या रेल्वेजना १९३८–३९ मध्यें घसारा, व्याज इत्यादि सर्व वजा जातां १ कोटि, ३७ लक्ष रुपये नफा झाला. तो मध्यवर्ती सरकारकडे त्या वर्षीच्या देण्यापैकीं अंश म्हणून जमा करण्यांत आला. रेल्वेजचें एकूण उत्पन्न १९३७–३८ च्या मानानें ५३ लाखांनीं कमी झालें आणि खर्चात १ कोटीची वाढ झाली.

### राष्ट्रसभेच्या अधिवेशनामुळें रेल्वेजच्या उत्पन्नांत वाढ

त्रिपुरी येथील काँग्रेसच्या गेल्या वर्षीच्या अधिवेशनामुळें हिंदी रेल्वेजना एकूण सुमारें १७½ लक्ष रुपयांचें उत्पन्न अधिक झालें.

### विदेशी चित्रपटांना कात्री

हिंदी लोकांच्या भावना दुखविणाऱ्या १९ विदेशी चित्रपटांना १९३४ ते १९३८ ह्या मुदतींत कात्री लावण्यांत आली अगर ह्या अथवा त्या प्रांतांत त्यांस बंदी करण्यांत आली.

### रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत दुरुस्ती

रिझर्व्ह बँकेचे हिशेबाचें वर्ष सध्या जानेवारी ते डिसेंबर आहे, तें बदलून जुलै ते जून करणारी एक दुरुस्ती रिझर्व्ह बँक ॲक्टांत करण्यांत येणार आहे, असें कळतें. सध्याच्या व्यवस्थेप्रमाणें हिशेबाचें वर्ष डिसेंबर अखेर संपतें, त्यामुळें बँकेचा वार्षिक रिपोर्ट तयार करण्याचें काम कामाच्या गर्दीच्या मोसमांत उरकावें लागतें.

### मुंबई शहरांतील आत्महत्या

मुंबई शहरांत १९३९ सालीं एकूण ११३ लोकांनीं आत्महत्या केली. विष घेणें, खिडकींतून खाली उडी टाकणें, स्वतःस जाळून घेणें, इत्यादि आत्महत्येचे मार्ग विशेष लोकप्रिय होते. गळफास लावून घेणारे कमी आढळले आणि फक्त ५ लोकांनीं जीव देण्यासाठीं आगगाडीखालीं स्वतःस चिरडून घेतलें.

### मध्यवर्ती सरकारचें बजेट

सरकारी हिशेबाचें चालू वर्ष मार्चअखेर संपतें, तेव्हां वर्षअखेर मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्न—खर्चाची तोंडमिळवणी होईल किंवा नाहीं ह्याबाबत तर्कवितर्क आतांपासून सुरु झाले आहेत. एक्साइजच्या उत्पन्नांत बरीच घट पडली तरी ती कस्टम्सनीं भरून काढली आहे आणि चालू वर्षाचे हिशेबांत, सरकारी खर्चात विशेष वाढ झाली नसल्यास, फारशी तूट दिसणार नाहीं, असा अजमास आहे. खर्चात किती वाढ झाली आहे, हें आजच सांगतां येण्यासारखें नाहीं.

### कराची पोर्ट ट्रस्ट.

कराची पोर्टट्रस्टनें १९३८–३९ मध्यें कराची बंदर सुधारण्यासाठीं सुमारें ९५ लक्ष रुपये खर्च केले. ह्या वर्षी बंदरास ७८ लक्ष, २१ हजार रुपये उत्पन्न झालें आणि ६९ लक्ष, ९९ हजार रुपयांचा खर्च वजा जातां ८ लक्ष, २२ हजार रुपयांचा वाढावा उरला.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ७४ |
| २ नफ्यावरील कराची वेळ अजून आलेली नाहीं | ७५ |
| ३ फ्रेंच साम्राज्य | ७६ |
| ४ हिंदी बँकांच्या शाखा | ७६ |
| ५ स्फुट विचार | ७७ |
| स्वदेशी धंद्यांचा विस्तार—यंत्रांची आयात—युद्ध आणि सरकारचें आर्थिक धोरण—मध्यवर्ती असेंब्लींत जादा करावरील चर्चा | |
| ६ मुंबई सरकारच्या उत्पन्न-खर्चाचा आढावा | ७८ |
| ७ जादा नफ्यावरील कराचें बिल ... ... | ७९ |
| ८ हिंद-सिलोन व्यापार | ७९ |
| ९ शेअर दलालांच्या कारकुनांची कारवाई ... | ७९ |
| १० जपानी माल इतका स्वस्त कां? ... ... | ८० |
| ११ युरल्ये | ८१ |
| १२ "फ्रूट सॉल्ट" व "फलक्षार" ... | ८१ |
| १३ भारतीय कलावैभव प्रदर्शन | ८२ |
| १४ ग्रेट-ब्रिटनची युद्धाची तयारी | ८२ |
| १५ जपानमधून पेन्सिलींची निर्गत ... ... | ८२ |
| १६ चोरून पत्रें पाळविणारांवर खटला ... ... | ८२ |
| १७ निवडक बाजारभाव | ८३ |



# अर्थ

बुधवार, ता. १४ फेब्रुवारी, १९४०


## नफ्यावरील कराची वेळ अजून आलेली नाहीं

हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेरेमी रेसमन, ह्यांनीं फाजील नफ्यावरील कराचें बिल मध्यवर्ती असेंब्लीपुढे मांडतांना सरकारी तिजोरीची गरज आणि कराच्या बोजाची न्याय्य वांटणी ह्या दोन मुद्यांवर भर देऊन आपल्या धोरणाचें समर्थन केलें. सरकारी तिजोरीस अधिक पैसा उभा करण्याची आवश्यकता कां आहे आणि जादा खर्च सरकार कोणता करणार ह्याची लोकांस व कायदेमंडळासहि कांहीं माहिती नसतां नवीन कर बसवण्याचें सरकारनें ठरवून त्याच्या कायद्याचा मसुदाहि असेंब्लीपुढे मांडावा, हें चमत्कारिक आहे. लोकांस जबाबदार नसलेल्या राज्यव्यवस्थेंतच ही गोष्ट संभवते हें उघड आहे. युद्धामुळें हिंदुस्थान सरकारास लष्करी व इतर खर्च अधिक प्रमाणांत करावा लागणार आणि तो भागवण्यासाठी जनतेवरील करांचा बोजा वाढवणें अपरिहार्य आहे हें सर जेरेमी ह्यांनीं गृहीत धरूनच नवीन कराच्या योजनेचें समर्थन केलें. असेंब्लीमध्यें कॉंग्रेसपक्षीय सभासद नाहींत आणि इतर सभासदांच्या निरनिराळ्या गटांमध्यें ह्या योजनेच्या संबंधांत एकमत नाहीं. "तत्त्व मान्य, तपशील अमान्य" ह्या मताचे अनेक सभासद आहेत आणि बिलाच्या मूलभूत तत्त्वासच विरोध करणारी मंडळी थोडी आहे. ह्या कारणानें फडनवीसांचें बिल सिलेक्ट कमिटीकडे सोंपवण्यांत आलें. असेंब्लीच्यापुढें येत्या सालचें अंदाजपत्रक मांडून सरकारच्या खर्चाची कल्पना सभासदांस आल्यावर नवीन कराविषयींची सूचना करणें हा नेहमीचा व सरळ मार्ग आहे. तो बाजूस सोडून नवीन कराची योजना स्वतंत्रपणानें असेंब्लींत प्रविष्ट करण्याची पद्धति असमर्थनीय आहे असें दिसल्यावरून सिलेक्ट कमिटीनें रिपोर्ट करण्याची तारीख आतां लांबवण्यांत आली आहे. त्यापूर्वी बजेट असेंब्लीपुढे येईल आणि त्याच्या दृष्टीनें बिलाचा विचार करणें सोयीचें होईल अशी पळवाट आतां काढण्यांत आली आहे. परंतु बिलावर तात्त्विक व व्यावहारिक असा जो दुहेरी आक्षेप आहे, तो ह्या युक्तीनें दूर होऊं शकत नाहीं.

नवीन कराचें मुख्य तत्त्व मान्य करणें सरळपणाचें आहे असें कित्येकांस वाटतें. तें तत्त्व तरी काय आहे? युद्धामुळें अनपेक्षित व अनर्जित नफा कांहीं व्यक्ती व औद्योगिक मंडळ्यां ह्यांस होईल तो समर्थनीय नाहीं. बाजारभाव वाढणें, सरकारनें युद्धोपयोगी माल मोठ्या प्रमाणांत व चढलेल्या किंमतीनें खरेदी करणें इत्यादि विशिष्ट परिस्थितिजन्य कारणांनीं जादा नफा निर्माण होईल त्यावर राष्ट्राचा म्हणजे सरकारचा हक्क आहे. आपला वाढलेला व वाढणारा खर्च भागवण्यासाठी असल्या फायद्यांतला भाग सरकारनें उचलावयाचा नाहीं तर दुसऱ्या कोणत्या उत्पन्नाचा हिस्सा सरकारनें घ्यावा? मूठभर लोकांनीं नफा मिळवावा आणि सर्व जनतेनें जादा कराचा बोजा उचलावा हें न्याय्य व नीतीस धरून नाहीं. सर जेरेमी ह्यांनीं नवीव कराचें समर्थन केलें त्याच्या मुळाशीं असलेल्या मुद्यांचा वरीलप्रमाणें मथितार्थ आहे. ह्या कराचें तत्त्व न्याय्य आहे असें म्हणणारांनीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं कित्येक वेळां तपशीलामुळें तत्त्वास हरताळ फासला जात असतो. युद्धामुळें होणारा फायदा म्हणजे तरी काय? त्याची व्याख्या कशी करणार? ह्या फायद्याचा अंश सरकारनें आज उचलला तर ज्यांचेवर कर लादला जाणार त्यांस दोन वर्षांनीं तोटा येईल तेव्हां त्याचे वाटेकरी सरकार होणार आहे काय? कंपन्यांस होणारा नफा युद्धामुळेंच झाला हें कसें व कोण ठरवणार? गेलीं दहा वर्षें आर्थिक मंदीचीं असल्यानें अनेक धंदे आपला संसार कसा तरी चालवीत होते. मागील सालांतला त्यांचा मर्यादित नफा हें कायदेशीर माप समजून तो आणि चालू वर्षी होणारा नफा ह्यांमधील फरकाचा निम्मा हिस्सा सरकारनें उचलण्याचें योजलें आहे, हा सरळ व न्याय्य व्यवहार आहे काय? हा फरक अर्थातच फुगलेला दिसणार, पण तो सरकारनें घेऊं पहाणें सर्वस्वी चुकीचें आहे. चालू व पुढील वर्षी होणारा नफा मागील नुकसान, अबळा व झीज हींच भरून काढण्यास कित्येक धंदेवाल्यांस पुरा पडणार नाहीं. त्यांतला मोठा भाग सरकारनें कराचे स्वरूपांत घेतल्यास हिंदी धंदे कच्चे व लेचेपेचे राहून युद्धसमाप्तीबरोबर येणाऱ्या मंदीस तोंड देण्याचें सामर्थ्य त्यांमध्यें रहाणार नाहीं. हिंदी कारखान्यांनीं अवश्य केली पाहिजे अशी कोणती एक गोष्ट आज असेल तर ती त्यांनीं आपले रिझर्व्ह व घसारा फंड वाढवणें ही आहे. युद्धपरिस्थितीमुळें होणाऱ्या नफ्याचा विनियोग त्यांनीं सर्वस्वी ह्याच कामीं करणें अगत्याचें आहे. असें न होईल तर दोन-तीन वर्षांनीं त्यांची स्थिति असमाधानकारक झाल्यावांचून रहावयाची नाहीं. मागील महायुद्धकाळापासून हा बोध न घेणें अदूरदर्शीपणाचें व आत्मघातकी होणार आहे.

ह्या कामांत सरकारवरहि जबाबदारी येऊन पडते. युद्धोपयोगी माल तयार करण्यासाठी लोकांनीं नवे धंदे काढावे आणि जुन्यांचा विस्तार करावा अशी त्यांची अपेक्षा आहे. तिची फलद्रूपता आणि फाजील नफ्यावरील नियोजित कर हीं विसंगत आहेत. युद्धोत्तर काळांत हिंदी धंदे टिकावे ही इच्छा सरकारचीहि असली पाहिजे. सोन्याचीं अंडीं घालणारी हंसी मारून टाकण्याचा वेडेपणा त्यांनीं करतां कामा नये. सुमारें पांच हजार धंदेवाले व कंपन्या ह्यांच्यावरच नव्या कराचा बोजा पडेल असें सर जेरेमी ह्यांचें म्हणणें आहे. परंतु ह्या लोकांच्या धंद्यांशीं लक्षावधि लोकांचे हितसंबंध निगडित झाले आहेत, ही गोष्ट त्यांनीं दृष्टीआड केली आहे. तसेंच, नव्या कराचे परिणाम

स्वदेशी धंद्यांस भोगावे लागणार असल्यानें त्यांत आपले पैसे घालण्याची किंवा ठेवण्याची लोकांस धास्ती वाटल्यावांचून राहाणार नाहीं. देशी धंद्यांचा पाया मजबूत राहून युद्धोत्तर आर्थिक मंदीची बाधा त्यांस होणार नाहीं, ह्या रीतीनें त्यांनीं मिळवलेल्या नफ्याचा हिस्सा सरकारनें घेण्यास हरकत नाहीं. तथापि, अशी परिस्थिति निर्माण होण्यास अजून कांहीं काळ लोटावा लागेल. थोड्या श्रीमान लोकांच्या नफ्याचा हा प्रश्न नसून त्याचा जिव्हाळ्याचा संबंध हिंदुस्थानच्या औद्योगिक प्रगतीशीं आहे. फाजील नफ्यावर जबर कर बसवण्यांत सरकार घिसाडघाई करीत आहे. विशिष्ट परिस्थितींत असा कर बसवणें आवश्यक व योग्य होईल ह्यांत शंका नाहीं, पण ती वेळ अजून आलेली नाहीं. ह्या रीतीनें प्रस्तुत प्रश्न केवळ तपशिलाचा नसून तो अत्यंत महत्त्वाच्या तत्त्वाचा आहे.

## फ्रेंच साम्राज्य

फ्रान्सचें साम्राज्य ब्रिटिश साम्राज्याइतकें मोठें नसलें आणि फ्रेंच साम्राज्याची संपत्ति ब्रिटिश साम्राज्याच्या, अमेरिकेच्या अगर रशियाच्या संपत्तीपेक्षा कमी असली तरी त्याची उत्पादनशक्ति फ्रान्स देशाचें सामर्थ्य टिकविण्यास पुरेशी आहे. धातुंच्या उत्पादनाचे बाबतींत फ्रान्सचा पांचवा अनुक्रम लागतो. फॉस्फेट्सच्या जागतिक उत्पादनापैकी ३२% उत्पादन फ्रेंच हद्दींत होतें. इतरहि आवश्यक वस्तुंचें उत्पादन फ्रेंच साम्राज्यांत मोठ्या प्रमाणावर होतें. फ्रेंच वसाहतींच्या निर्गतीच्या आकड्यांवरून फ्रेंच साम्राज्याच्या आर्थिक सामर्थ्याची कल्पना येईलः—

| निर्गत | फ्रँक (कोटि) |
| --- | --- |
| अल्जेरिया | ५६५ |
| पश्चिम आफ्रिका | १५३ |
| विषुववृत्तावरील आफ्रिका | २५½ |
| इंडो चायना | २५९ |
| मादागास्कर | ५९ |
| फ्रेंच मोरोक्को | १५० |
| सिरिया | २५७ |
| ट्युनिशिया | ११४ |
| कॅमेरुन्स | २५ |
| | १६०८½ |

१९४० सालीं फ्रेंच वसाहतींची लोकसंख्या ५½ कोटि होती आणि त्यापैकी सुमारें ७½ लक्ष लोक त्या वेळच्या सैन्यांत दाखल झाले होते. आजची फ्रेंच वसाहतींची लोकसंख्या ६½ कोटींवर आहे. उत्तर आणि पश्चिम आफ्रिका, वेस्ट इंडियन वसाहती, मादागास्कर आणि इंडोचायना येथें सक्तीचें लष्करी शिक्षण चालू आहे.

## हिंदी बँकांच्या शाखा

हिंदी बँकांच्या अग्रभागीं असलेल्या रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग खात्याच्या मुंबई, कलकत्ता, मद्रास, दिल्ली आणि रंगून येथें मिळून पांच कचेऱ्या आहेत आणि चलन खात्याच्या मुंबई, कलकत्ता, मद्रास, रंगून, कानपूर, लाहोर आणि कराची येथें मिळून सात शाखा आहेत. तिचें लंडन येथेंहि ऑफिस आहे.

इंपीरिअल बँकेच्या ३५५ शाखा आहेत, आणि त्या सर्वांत मिळून ८९ कोटि रुपयांच्या ठेवी आहेत.

एक्सचेंज बँकांची संख्या १९ असून त्यांच्या हिंदुस्थानांतील शाखांची संख्या १०१ आहे.

हिंदुस्थानांतील पांच "प्रमुख बँका" म्हणजे सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, अलाहाबाद बँक, बँक ऑफ बरोडा आणि पंजाब नॅशनल बँक ह्या सर्वांत मिळून ७३ कोटि रुपयांच्या ठेवी आहेत. त्यांच्या शाखांची संख्या २६० भरते.

उरलेल्या ३० शेड्यूल्ड बँकांकडे १८ कोटि रुपयांच्या ठेवी असून त्यांच्या ४०९ शाखा आहेत.

गेल्या पांच वर्षांत शेड्यूल्ड बँकांची संख्या २२% वाढली आणि त्यांच्या शाखांची संख्या ७२% वाढली.

### शेड्यूल्ड बँकांच्या शाखांची वर्गवारी

खालील तक्त्यांत शेड्यूल्ड बँकांच्या शाखांची प्रांतवार वर्गवारी केलेली आहेः—

| प्रांत | लोकसंख्या (लक्ष) | शेड्यूल्ड बँका | एकूण शाखा व कचेऱ्या | दर १० लक्ष लोकवस्तीशीं शाखांचें प्रमाण |
| --- | --- | --- | --- | --- |
| आसाम | ८६ | ६ | २४ | २·८ |
| बंगाल | ५०१ | ३२ | १४३ | २·९ |
| बिहार व ओरिसा | ३७७ | १३ | ३९ | १·० |
| मुंबई व सिंध | २१९ | ३२ | १४८ | ६·८ |
| ब्रह्मदेश | १४७ | १७ | २५ | १·७ |
| मध्यप्रांत-वऱ्हाड | १५५ | ४ | १८ | १·२ |
| मद्रास | ४६७ | १७ | २६८ | ५·७ |
| पंजाब | २३६ | १४ | १६३ | ६·९ |
| संयुक्त प्रांत | ४८४ | १५ | १२९ | २·७ |
| सरहद्द प्रांत | २३ | २ | ९ | ३·९ |

मद्रास प्रांतांत सर्वांत अधिक बँकांच्या शाखा आहेत, तर लोकवस्तीच्या मानानें त्यांची संख्या सर्वांत अधिक पंजाबांत आहे. मुंबई आणि सिंध ह्यांचा अनुक्रम नंतर लागतो.


दी सेन्ट्रल प्रॉव्हिन्सेस् अँण्ड बेरार

प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नागपूर सिटी.

पैसे गुंतविण्यास उत्तम संधि — महाणी कर्जरोख्यांची चतुर्थ आवृत्ति

व्याजाचा दर ४ ट. दरसाल दर शेकडा } रु. ५,००,००० { मुदत ३५ वर्षे

दर्शनी किंमतीस विक्री

मुद्दल व व्याजाच्या फेडीसाठी सरकारी पूर्ण हमी (Guarantee)

सहामाही व्याज

सविस्तर माहितीसाठी प्रसिद्धीपत्रक (प्रॉस्पेक्टस) मागवा.

जी. ए. भोसुले, मॅनेजर.

## स्फुट विचार

### स्वदेशी धंद्यांचा विस्तार—यंत्रांची आयात

हिंदुस्थानांत स्वदेशी धंद्यांची व कारखान्यांची हळु हळु वाढ होत आहे ही गोष्ट अभिनंदनीय आहे. ह्या प्रवृत्तीस उत्तेजन मिळून तिच्या मार्गांत फाजील नफ्यावरील करासारखीं विघ्नें येणार नाहींत ह्याविषयीं खबरदारी घेण्याचें महत्त्व ह्या दृष्टीनें उघड आहे. देशी कारखान्यांच्या वाढीस आवश्यक असलेली यंत्रसामुग्री हिंदुस्थानांत अजून तयार होत नाहीं आणि ती परदेशांतून आणावी लागते. युद्धामुळें यंत्रांच्या आयातीचे मार्गांत अडचणी उत्पन्न झाल्या आहेत. किंमती वाढून वहातुकीचीं साधनें पूर्वीप्रमाणें सुसाध्य नाहींत. तथापि, डिसेंबर महिन्याबाबतचे हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून यंत्रसामुग्रीची आयात वाढत्या प्रमाणावर होत आली असल्याचें दिसून येतें. गेल्या नोव्हेंबरच्या मानानें डिसेंबर महिन्यांतली यंत्रांची आयात २९ लक्ष रुपयांनीं अधिक होती. एप्रिल—डिसेंबर ह्या नऊ महिन्यांचे मुदतींत गेल्या वर्षाच्या तत्सम काळापेक्षा २२ लक्ष अधिक किंमतीचीं विविध प्रकारचीं यंत्रें ह्या देशांत आलीं. केवळ डिसेंबर महिन्यांतल्या यंत्रांच्या आयातीचे आकडे घेतले तर ब्रिटिश मालाची आयात वाढली असून इतर देशांची कमी झाली आहे असें दिसून येतें. अमेरिकन यंत्रांची आयात मात्र वाढली आहे. कागदाच्या बनावटीचीं यंत्रें फारशीं आलीं नाहींत; पण रेफ्रिजिरेटर्सची आयात वाढली. भात कांडावयाचीं व पीठ दळण्याचीं यंत्रें ग्रेटब्रिटनमधून पूर्वीच्या महिन्याचे मानानें डिसेंबरांत ज्यास्त आलीं. शिवणकामाचीं यंत्रेंहि ब्रिटनमधून अधिक प्रमाणांत आलीं. कापूस कारखान्यांच्या यंत्रसामुग्रीच्या आयातींत ब्रिटिश मालाचाच सर्व भरणा होता. सुमारें १७ लक्ष रुपये किंमतीची ही आयात डिसेंबर महिन्यांत झाली, तीपैकी १५½ लक्षापेक्षां अधिक यंत्रें ब्रिटनमधून आलीं. यंत्रांची एकूण आयात सव्वा कोटि रुपयांची झाली, तीमध्यें ग्रेट ब्रिटनचा हिस्सा पाऊण कोटि रुपयांचा होता.

---

### युद्ध आणि सरकारचें आर्थिक धोरण

मद्रास येथें व्यापारी व कारखानदार ह्यांच्या एका सभेंत भाषण करतांना श्री. मनु सुभेदार ह्यांनीं युद्धपरिस्थितींतून उत्पन्न होणाऱ्या कित्येक महत्त्वाच्या प्रश्नांचा उल्लेख केला. आर्थिक बाबतींत योजावयाचे उपाय हिंदुस्थानच्या विशिष्ट प्रकारच्या स्थितीस व गरजांस अनुसरून असले पाहिजेत आणि सरकारनें त्यांचे संबंधांत इंग्लंडची केवळ नक्कल करून चालावयाचें नाहीं असें ते म्हणाले. हुंड्यांवरील स्टँप ड्यूटी कमी करण्याबद्दल आणि सरकारजवळची चांदी लंडनच्या ऐवजीं ह्या देशांतच विकण्याचें ठरवण्याबद्दल त्यांनीं फडनविसांचें अभिनंदन केलें. ह्या धोरणाविषयीं हिंदी लोकमताचा आग्रह दीर्घकाळ चाललेला होता आणि सरकारनें आतां त्यास मान दिला आहे. हिंदुस्थानच्या आर्थिक स्थितींतलीं वैगुण्यें दूर करण्याची संधि सध्यां प्राप्त झाली असतां तिचा उपयोग योग्य रीतीनें सरकार करीत नाहीं अशी तक्रार श्री. सुभेदार ह्यांनीं केली. त्यांनीं एक नवीन मुद्दा उपस्थित केला, तो हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापारांत निघणारी ह्या देशाची येणें बाकी लंडनमध्यें स्टर्लिंगच्या स्वरूपांत ठेवण्यांत येत आहे त्या विषयींच्या धोरणाबाबतचा होता. स्टर्लिंगची सोन्यांतली किंमत युद्ध बराच काळ चालू राहिल्यास खालीं जाणें शक्य असल्यानें हिंदुस्थानचा शिलकी पैसा इंग्लंडमध्यें जमा करून ठेवणें वेडेपणाचें आहे असें त्यांनीं सांगितलें. सोन्याचा ह्या देशांतला संचय वाढवण्याची आवश्यकताहि त्यांनीं प्रतिपादली. रिझर्व्ह बँकेपाशीं सोनें शिलकी आहे त्याचा हिशेब जुन्या किंमतींत आहे. त्या सोन्याची किंमत चालू बाजारभावानें करून, इतर राष्ट्रांच्या धोरणास अनुसरून, अशा रीतीनें वाढलेल्या रिझर्व्हच्या तारणावर चलनी नोटा काढण्यांत याव्या असेंहि त्यांनीं सुचविलें. शेवटीं फाजील नफ्यावरील कराच्या योजनेवर त्यांनीं प्रतिकूल टीका करून त्याचा परिणाम हिंदी उद्योगधंद्यांवर अनिष्ट होईल असें सांगितलें.

---

### मध्यवर्ति असेंब्लींत नफ्यावरील कराची चर्चा

फाजील नफ्यावरील कराच्या बिलाविरुद्ध लोकमत देशभर व्यक्त झालें आहे आणि करण्यांत येत आहे व व्यापारी संघांनीं चोहोंकडे त्याचा निषेध केला आहे. मुंबईस प्रमुख व्यापाऱ्यांची मोठी सभा भरून तीमध्यें श्री. चुनीलाल बी. मेथा, सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास प्रभृति प्रसिद्ध धंदेवाल्यांनीं बिलास आपला विरोध दाखविला. कंपन्यांच्या भागीदारांचे वतीनेंहि असाच अभिप्राय व्यक्त करण्यांत आला. मध्यवर्ति असेंब्लींत ह्या बिलाची चर्चा झाली, तीमध्यें एकदोन सभासद वगळून बहुतेक सभासदांनीं त्यास नापसंति दर्शविली. युद्धामुळें होणाऱ्या फायद्यांत सरकार कराच्या रूपानें हिस्सा घेतआहे असें सांगण्यांत येतें, तें वस्तुस्थितीस धरून आहे काय आणि नियोजित कराचा परिणाम हिंदी उद्योगधंद्यांच्या वाढीस व अस्तित्वास विघातक होणार नाहीं काय हे प्रश्न टीकाकारांनीं उपस्थित केले आहेत आणि त्यास समाधानकारक उत्तरें बिलाच्या पुरस्कर्त्यांस देतां आलेलीं नाहींत. कित्येक धंदेवाले व कंपन्या अवाच्या सवा फायदा मिळवीत आहेत, तो सरकारनें घेणें अन्यायाचें नाहीं असें मत कांहीं लोकांनीं प्रकट केलें आहे, पण तें वस्तुस्थितीच्या कसास उतरलें पाहिजे. नफ्यावर मोठ्या प्रमाणांत कर आकारावयाचा तो युद्धामुळें झालेला नफा आहे आणि त्याचा परिणाम देशी उद्योगधंद्यांवर अनिष्ट होणार नाहीं अशी खात्री झाल्यावांचून 'फाजील नफा' ह्या शब्दांनीं कोणी आपली दिशाभूल करून घेतां कामा नये. देशी धंद्यांतलें भांडवल आणि त्यांचा फायदेशीरपणा ह्यांस नियोजित करानें बाध येणार असल्यानें अप्रत्यक्ष रीतीनें परंतु निश्चयानें कामकरीवर्ग व सामान्य जनता ह्यांचें शेवटीं नुकसान झाल्यावांचून रहाणार नाहीं, हें लक्षांत येणें अगत्याचें आहे. असेंब्लीमध्यें झालेल्या भाषणांचा सूर बिलास प्रतिकूल असाच होता ह्यांत शंका नाहीं. लोकमत अजमावण्याकरितां जादा नफ्यावरील कराचें बिल प्रसिद्ध करण्यांत यावें आणि त्याची पुढची चर्चा बंद व्हावी ह्या आशयाचीं उपसूचना असेंब्लींत अमान्य होऊन तें सिलेक्ट कमिटीकडे पाठवण्यांत यावें ही मूळ सूचना बहुमतानें मंजूर झाली. असेंब्लीचें मत धाब्यावर बसवून बिल पास करण्याचा अधिकार सरकारास असल्याकारणानें सिलेक्ट कमिटींत त्याचें स्वरूप बदलून घेण्याचा प्रयत्न करणेंच श्रेयस्कर असल्याचा अभिप्रायहि कांहीं पुढाऱ्यांनीं व्यक्त केला. एकंदरीनें असेंब्लीमध्यें बिलास जोराचा विरोध झाला आहे हें स्पष्ट झालें आहे.

---

## मुंबई सरकारच्या उत्पन्न-खर्चाचा आढावा

(मुंबई प्रांताचे १९३८–३९ सालाबाबतचे पक्के हिशेब आता तयार झाले असून त्यासंबंधांतील ऑडिटर जनरलचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे.)

### उत्पन्न वाढलें, खर्च कमी झाला

अंदाजापेक्षा २३ लक्ष रुपये उत्पन्न ज्यास्त झालें, आणि अपेक्षेपेक्षा खर्च ३६ लाखांनीं कमी झाला. म्हणजे एकूण ५९ लक्ष रुपयांची बचत झाली. जमीनमहसुलाचें उत्पन्न १५ लाखांनीं वाढलें, प्राप्तीवरील कराचे ५ लक्ष रुपये अधिक मिळाले आणि एक्साइजमध्यें ८ लाखांची तूट आली, तरी इतर करांनीं ती भरून काढली. इरिगेशन खात्यावर १५ लक्ष रुपये कमी खर्च झाले आणि शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, उद्योगधंदे, इत्यादींसाठी राखून ठेवलेल्या रकमेपैकी बरीच मोठी रकम शिलक राहिली.

### स्पेशल डेव्हलपमेंट फंड

वरील अनुकूल परिस्थितीमुळें आणि पूर्वीच्या वर्षांतील वाढाव्यामुळें सरकारास "स्पेशल डेव्हलपमेंट फंड" निर्माण करून त्यांत ५० लक्ष रुपये टाकतां आले. शिक्षण, आरोग्य, शेती, इत्यादींबाबत योजना हातीं घेऊन, ग्रँट वेळेवर खर्ची न पडल्यास ती बुडेल अशी भीति बाळगण्याचें कारण न उरतां त्या योजना चांगल्या तऱ्हेनें सरकारी खात्यांस पार पाडतां याव्या, असा ह्या फंडाचा हेतु आहे.

### ९४ लक्षांच्या तुटीऐवजी ३५ लक्ष रुपये तूट

वरील फंडाकडे ५० लक्ष रुपये वर्ग केल्यानंतर ३५ लक्ष रुपयांची तूट आली. अंदाजपत्रकांत, फंडांत ५० लक्ष रुपये न टाकतां, ४४ लक्ष रुपयांची तूट दिसत होती. म्हणजे, ५९ लक्षांनीं हिशेबास मजबुतीच आणली, असा अर्थ झाला.

### कर्जविषयक परिस्थिति

१९३८–३९ मध्यें सरकारनें चालू उत्पन्नांतूनच सुमारें ७½ लक्ष रुपयांचा भांडवली स्वरूपाचा खर्च केला. कर्ज कोणतेंहि काढलें नाहीं. वर्षअखेर, सरकारास ३५½ कोटि रुपयांचें कर्ज आहे, त्यापैकी १२½ कोटि रुपये कर्ज मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशन आणि इंप्रूव्हमेंट ट्रस्ट ह्यांबाबत आहे. सरकारनें म्युनिसिपॅलिट्या, शेतकरी, सरकारी नोकर, इत्यादींस मिळून १½ कोटि रुपये कर्जाऊ दिलेले आहेत, ते सरकारकडे येणें आहेत. सरकारी नोकरांचा सुमारें २½ कोटि रुपयांचा प्रॉव्हिडंट फंड सरकाराकडे बाकी आहे.

**हिंदुस्थानांतून सोन्याची निर्गत (रु.)**

| | |
|---|---|
| २१ सप्टेंबर, १९३१ ते ३१ डिसेंबर, १९३८ | ३,१७,५१,६४,२२७ |
| १ जानेवारी ते ३० जून, १९३९ | ५,५८,९७,०९४ |
| जुलै, १९३९ | ३,०४,७९,१४९ |
| ऑगस्ट, १९३९ | १,५३,८१,९४० |
| सप्टेंबर, १९३९ | १,९५,१७,२०१ |
| ऑक्टोबर, १९३९ | ४,८८,७५,५०९ |
| नोव्हेंबर, १९३९ | ९,४७,५७,०३९ |
| डिसेंबर, १९३९ | ६,५६,७१,२०५ |
| २१ सप्टेंबर १९३१ ते ३१ डिसेंबर, १९३९ | ३,४३,२७,१०,४९४ |


**पूर्व खानदेश**
**सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.**
**जळगांव.**
(स्थापना : मे १९१६) रु.

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल. ...... | १०,००,०००।– |
| जमा झालेलें शेअर भांडवल....... | ४,६९,०००।– |
| रिझर्व्ह फंड. ...... | २,९८,०००।– |
| इतर फंडस्. ...... | ३,७७,०००।– |
| खेळतें भांडवल (३०-६-३९) ...... | ५७,८९,०००।– |

डिव्हिडंड पांच टक्के (सहा वर्षांपासून)

हेड ऑफिस :—सेंट्रल-को-आपरेटिव्ह बँक बिल्डिंग, नवी पेठ, जळगांव.

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व भागांत शाखा व पे-ऑफिसेस चांगल्या रीतीनें चालू आहेत.

—: बँकर्स :—
मुंबई : मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. मुंबई.
जळगांव : इंपीरिअल बँक ऑफ इंडिया.
अहमदाबाद : बँक ऑफ इंडिया लि.
नागपूर : सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल कोआपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेचे हिशेब त्रैमासिक रजिस्टर्ड अकौंटंटचे फर्मकडून व वार्षिक सरकारी स्पेशल ऑडिटराकडून तपासले जातात.

चालू ठेवीवर : अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज ठेवीवर : दोन टक्के व्याज देण्यांत येतें.
मुदतीच्या ठेवीवर : तीन ते साडे चार टक्के. व्याज मुदतीप्रमाणें देण्यांत येतें.

ठेवीदाराचे व्यवहार सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत केले जातात. बँकेशीं व्यवहार करणारांचे सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत योजना करण्यांत येते.

सर्व प्रकारच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. ठेवीवरील व्याजाचे दर अगर व्यवहाराच्या अटी समक्ष अगर पत्रद्वारें कळविण्यांत येतील.

को-ऑपरेटिव्ह संस्थांना मुदतीच्या ठेवीवर इतरांपेक्षा अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येतें.

बी. डी. देशमुख,
चेअरमन.



**बँका आणि त्यांचे व्यवहार**
दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.
☞ किं. १ रु. ८ आणे ☜
१ रु. १० आ. चे पोस्टाचीं तिकिटें पाठवून मागणी करा.
: लेखक :
प्रो. वा. गो. काळे ◆ श्री. श्री. वा. काळे
बँकिंगविषयक प्रश्नांचे विवेचन करणारें अत्यंत उपयुक्त पुस्तक
"अर्थ" ग्रन्थमाला, : : पुणें ४.

### जादा नफ्यावरील कराचें बिल

( वरील बिल मध्यवर्ती असेंब्लीस ६ फेब्रुवारी रोजीं सादर करण्यांत आलें. त्यांतील महत्त्वाच्या बाबी खालीं दिल्या आहेत. )

( १ ) बिलामध्यें २६ कलमें आणि ३ परिशिष्टें आहेत. बिल सबंद ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे.

( २ ) बिलांतील योजनेप्रमाणें हिशेब केलेल्या मामुली दराच्या नफ्यापेक्षा ज्यास्त झालेल्या नफ्यावर ५०% कर बसविण्यांत येईल.

( ३ ) १ एप्रिल, १९३९ नंतर मिळालेल्या नफ्यास कर भरावा लागेल.

( ४ ) १ एप्रिल १९३५ पूर्वीपासून ज्यांचा उद्योगधंदा चालू असेल, त्यांच्या मामुली नफ्याचा हिशेब करतांना चार प्रकार उपलब्ध आहेत, परंतु त्यानंतर ज्यांच्या उद्योगधंद्यास प्रारंभ झाला त्यांचा नफा गुंतलेल्या भांडवलावर ठराविक दरानें आकारला जाऊन त्यापेक्षा अधिक होणारा नफा करास प्राप्त होईल. कंपन्यांस ८% आणि इतरांचा १०% नफा मामुली समजला जाईल.

( ५ ) सालिना २० हजारांपेक्षा कमी नफा मिळणाऱ्या उद्योगधंद्यांस हा कर लागू नाहीं.

---

### हिंदुस्थान आणि सिलोन ह्यांमधील व्यापार

| | हिंदुस्थानांत आयात | हिंदुस्थानांतून निर्गत |
|---|---|---|
| १९३८ | ९० लक्ष रु. | ५१२ लक्ष रु. |
| १९३९ | १०७ लक्ष रु. | ५२२ लक्ष रु. |

हिंदुस्थानांतून जेवढी निर्गत होते त्यापेक्षा आयात सुमारें ४½ कोटि रुपयांनीं कमी होते. सिलोनांतून येणाऱ्या मालापैकी तीन चतुर्थांश माल, म्हणजे खोबरें व त्याचे जिन्नस होय. १९३७ सालीं हिंदुस्थाननें १ कोटि, १९ लक्ष रुपयांचें सिलोनी खोबरें घेतलें होतें. १९३८ सालीं सिलोननें सुमारें १३½ हजार टन खोबरेल पाठविलें. ह्याच वर्षी हिंदुस्थानांत सिलोनांतून ३५ लक्ष नारळांची आयात झाली. म्हणजे, रुपयास २३ नारळ पडले. सिलोनी रबराची हिंदुस्थानांतील आयात मंदावत चालली आहे. १९३८ मध्यें फक्त ३,९०० रुपयांचें ७,९४० पौंड रबर आलें. ग्राफाइटची आयातीची किंमत ३७½ हजार रुपये भरली. सुपारी वगैरेंच्या आयातीस जकातीच्या ३७½% दरामुळें थोडा आळा बसत आहे.

---

### शेअर दलालांच्या कारकुनांची कारवाई

मुंबई येथील शेअर बाजारांतील तीन गुजराती आणि एका पारशी दलालांस, त्यांच्या न कळत त्यांचे नांवावर व्यवहार करून, त्यांच्या कारकुनांनीं कसें फसविलें आणि गोत्यांत आणलें, ह्याची उद्बोधक हकीकत प्रसिद्ध झाली आहे. असें समजतें कीं, ह्या पांच–सहा कारकुनांनीं खासगी करार-वह्या ठेऊन आपल्या मालकांचे नांवानें व्यवहार केला, आणि जेव्हां दलालांना त्यांच्या हिशेबांत मोठा तोटा दिसून आला, तेव्हां त्यांनीं चौकशीस प्रारंभ केला. ज्यांची त्यांस माहितीहि नाहीं, अशा लोकांचे नांवानें कांहीं खरेदी–विक्रीचे करार त्यांस त्या वह्यांत आढळले. ह्या नांवांपैकीं कांहीं नांवें बनावट होतीं तर कांहीं नांवाचे लोक दरिद्री असलेले आढळले. बाजारभाव त्यांस अनुकूल झाले असते, म्हणजे ह्या नांवांवर कारकुनांनीं पैसे मिळवले असते, कारण कारकुनांनीं आपल्या फायद्यासाठी पुढें केलेलींच तीं सर्व नांवें होतीं. तथापि बाजारभाव त्यांस फारच प्रतिकूल झाल्यामुळें त्यांस पैसे भरणें अशक्य झालें आणि लबाडी बाहेर आली. फेब्रुवारीचे सेटलमेंटसाठी केलेल्या व्यवहारांतील ही भानगड "बदली" चे दिवशीं उघडकीस आली आणि त्यांत सहा कारकुनांचें अंग असलेलें दिसून आलें. ज्यांचेवर हा प्रयोग करण्यांत आला त्या चार शेअर दलालांचें ह्या व्यवहारांत सुमारें १½ लक्ष रुपयांचें नुकसान झालें आहे.

---

### कांहीं कंपन्यांस झालेला गेल्या सहा वर्षांतील नफा

( लक्ष रुपये )

| कंपनी | १९३४ | १९३५ | १९३६ | १९३७ | १९३८ | १९३९ | वर्ष अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बँक ऑफ इंडिया | १४·८८ | १५·८३ | १८·३३ | १८·२७ | १७·१९ | ... | ३१ डिसेंबर |
| सेंट्रल बँक | २३·३४ | १६·३४ | १८·७३ | २४·६० | ... | ... | ३१ डिसेंबर |
| बेलापूर (साखर) | १०·५६ | १०.६७ | १०·३८ | ८·०८ | ७·३० | १२·९४ | ३० सप्टेंबर |
| कानपूर ( „ ) | १०·२६ | ५·६८ | २·९६ | ४·१९ | ४·४८ | ... | ३१ डिसेंबर |
| शिंदा स्टीम | ९·७२ | १५·७६ | १४·४१ | १९·९० | २४·०८ | २४·६४ | ३० जून |
| टाटा पॉवर | २८·८३ | ३६·३७ | ४४·९० | ४६·३५ | ६६·३३ | ५९·२८ | ३० जून |
| टाटा हा. इ. | ३२·८९ | ३३·४५ | ३२·५७ | २८·८४ | ३०·६७ | ३२·४३ | ३० जून |
| इंडियन आयर्न | ३·९२ | १०·१५ | १४·७० | ४५·८९ | ११९·३७ | ५६·६१ | ३१ मार्च |
| टाटा स्टील | २४४·०९ | २८०·०० | २५६·०० | २७६·५६ | ४११·०० | ४७०·४१ | ३१ मार्च |
| कॅलिको मिल्स | ८·६३ | ८·०२ | ८·६२ | १३·५८ | १५·७३ | ... | ३१ डिसेंबर |
| अरविंद मिल्स | ५·५२ | ८·८४ | १०·४१ | १२·०२ | १३·०४ | ... | ३१ डिसेंबर |
| बॉंबे डाइंग | २३·०२ | ११·७१ | १५·५४ | २०·३४ | ३१·७३ | ... | ३१ डिसेंबर |

## जपानी माल इतका स्वस्त कां ?

(१) राष्ट्रीय आर्थिक नियंत्रण. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य पद्धतीच्या भांडवलशाहीचा जपानमध्यें सुंदर मिलाफ झाला आहे. भांडवलाच्या एकत्रीकरणामुळें, सरकारास आर्थिक संघटनेवर उत्कृष्ट नियंत्रण ठेवतां येतें.

(२) मजुरीचे हलके दर. अविभक्त कुटुंबाच्या पद्धतीमुळें कमी वेतन पुरतें; प्रत्येकास वेगळी चूल लागत नाहीं.

(३) कामगारांची शिस्त आणि संघटन. सर्व कामगार साक्षर असतात आणि शिस्तीची त्यांस सवय असते. लष्करी शिक्षणाच्या सार्वत्रिक फैलावामुळें त्यांचेमध्यें एकबंधुत्व निर्माण झालें आहे.

(४) नेत्यांची बुद्धिमत्ता आणि त्यांचें प्रगतिपर धोरण. जपानी औद्योगिक पुढाऱ्यांच्या मनाची ठेवण विशिष्ट प्रकारची, बुद्धिप्रधान, कष्ट सोसण्यास तयारी दर्शविणारी, अशी आहे आणि त्यामुळें संकटांस तोंड देण्यास ते नेहेमीं तत्पर असतात.

(५) यांत्रिक प्रगति. जपानमध्यें औद्योगिक प्रगति नुकतीच झालेली असल्याकारणानें, तेथील यंत्रसामुग्री अगदीं नवी आणि कार्यक्षम अशी आहे. त्यामुळें, ह्या यंत्रांपासून अधिकांत अधिक काम मिळूं शकतें.

(६) कार्यकुशल कामगार. यांत्रिक प्रगतीबरोबर कामगारांचें नैपुण्यहि वाढलें आहे.

(७) स्वस्त कच्चा माल. चीन, हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिया, साउथ सी आयलंड्स, हीं जपानची कच्चा-माल मिळविण्याचीं प्रमुख ठिकाणें होत. हे देश मागसलेले असल्यामुळें कच्चा माल स्वस्त मिळूं शकतो. जपानजवळ वहातुकीचीं साधनें विपुल आहेत.

(८) बाजारपेठेचें सान्निध्य. जपानच्या बाजारपेठा त्या देशाचे नजीकच असल्यामुळें माल सुलभतेनें पाठवितां येतो.

(९) आगबोटींच्या धंद्यास सरकारी सहाय. जपानचा आगबोटींचा धंदा सरकारी पुरस्कारामुळें अतिशय वाढला असून त्यामुळें जपान वहातुकीचे बाबतींत इतर देशांशीं स्पर्धा करूं शकतो.

(१०) अनुकूल हुंडणावळ. निर्गत व्यापारास अनुकूल हुंडणावळीमुळें प्रोत्साहन मिळतें.

### सनदी नोकरांची भरती

आय. सी. एस. च्या भरतीकरतां इंग्लंडमध्यें यंदाचे वर्षी परीक्षा घेतली जाणार नाहीं. ह्या परीक्षेस बसण्याच्या उद्देशानें कित्येक हिंदी विद्यार्थी ब्रिटिश विश्वविद्यालयांतून आज शिक्षण घेत आहेत, त्यांची निराशा होऊं नये ह्यासाठीं, ग्रेटब्रिटनमधून १९४० मध्यें सहा उमेदवार घेण्याचें सरकारनें ठरविलें आहे. त्याकरितां नेमण्यांत येणारें एक स्वतंत्र बोर्ड ह्या सहा जणांची निवड करील. ग्रेटब्रिटनमधील, मान्यता मिळालेल्या विश्वविद्यालयाची ऑनर्सची पदवी असणाऱ्या विद्यार्थ्यांतूनच उमेदवारांची निवड केली जाईल. हिंदुस्थानांतील परीक्षा नेहेमीप्रमाणें दिल्ली येथें १९४१ मध्यें घेतली जाईल.

### चेकसची देवघेव

मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें ९ फेब्रुवारी, १९४० अखेर संपलेल्या आठवड्यांत १६ कोटि, ८१ लक्ष रुपये किंमतीच्या १,०६,४७८ चेकसची देवघेव झाली.


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना—७ सप्टेंबर १९०६]

उभारलेलें भांडवल ... ... ... रु. २,००,००,००० 
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,००० 
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,१०,५०,००० 

मुख्य कचेरी—ओरिएण्टल बिल्डिंग, मुंबई.

शाखा—बुलियन एक्स्चेंज (शेख मेमन स्ट्रीट, मुंबई), बांद्रे (मुंबईनजीक), मलबार हिल (मुंबई), कुलाबा (मुंबई), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता–बडाबझार, चौरंघी स्क्वेअर ब्रँच, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी, नागपूर (किंग्जवे), जमशेदपूर.

लंडन एजन्ट्स—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल, परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों, व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों. विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींहि सुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड.

लक्ष्मीरोड, पुणें शहर.

अधिकृत भांडवल.........रु. १०,००,००० 
विक्रीस काढलेलें भांडवल ...रु. ५,००,००० 
खपलेलें भांडवल .........रु. ३,०४,१०० 
वसूल झालेलें भांडवल...रु. १,५२,०१०

शाखा

अेक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

डायरेक्टर्स

प्रो. व्ही. जी. काळे, चेअरमन; श्री. डी. के. साठे, व्हा. चेअरमन; श्री. एस. जी. पवार, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. व्ही. पी. बर्वे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एफ. डी. पदमजी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक काढतां येतात.

बँकेचे नियम व व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एस. व्ही. मोतले, मॅनेजर.

### युरुग्वे

याफच्ये ह्या जर्मन लढाऊ जहाजाच्या आत्मनाशामुळें प्रसिद्धी पावलेलें मॅंटिव्हिडिओ आणि ज्या राष्ट्राची राजधानी हें शहर आहे, त्या युरुग्वेचें नांव वृत्तपत्रांत बरेंच गाजलें आहे. मॅंटिव्हिडिओ हें बंदर आहे आणि त्याच्याजवळ असलेल्या टेकडीवरून त्यास हें नांव पडलें आहे. त्या शहराची लोकसंख्या सुमारें सात लक्ष आहे आणि ती गेल्या दोन पिढ्यांच्या अवधींतच एवढी मोठी झाली आहे. युरुग्वे देशाचें क्षेत्रफळ ७२ हजार चौरस मैल आहे आणि त्याची लोकसंख्या सुमारें २० लक्ष आहे. गुरें चरण्याचीं विस्तीर्ण कुरणें हा या देशाचा विशेष आहे. गहूं, मका इत्यादि पिकें त्यांत होत असलीं तरी युरुग्वेची संपत्ति त्यांच्या जनावरांचीच मुख्यत्वेंकरून आहे. गाई व बैल ह्यांची संख्या तेथें ८५ लक्ष असून २ कोटींच्यावर मेंढ्या आहेत. हा देश सामान्येंकरून सपाट आहे आणि पावसाचें वार्षिक मान ४२ इंच आहे. युरुग्वेचा मुख्य धंदा जनावरांशीं निगडित झाला असून त्यांचें मांस व लोकर ह्यांचा निर्गत व्यापार मॅंटिव्हिडिओ बंदरांतून मोठ्या प्रमाणावर चालतो. यंत्रसामुग्री, कापड, दारू, कोळसा, तेल इत्यादि मालाची आयात होते. युरुग्वेच्या व्यापारांत ग्रेटब्रिटनचा मोठा भाग आहे. त्याच्या रेल्वेजची लांबी आठराशे मैल आहे आणि त्यांतल्या बहुतेक ब्रिटिश मालकीच्या आहेत. जनावरांची अवलाद चांगली राखणें ही गोष्ट युरुग्वेस अत्यंत जिव्हाळ्याची आहे, आणि त्यासाठी चांगल्या जातींच्या गुरांची आयात ग्रेट ब्रिटनमधून करण्यांत येतें.

---

### "फ्रुटसॉल्ट" व "फलक्षार"

जे. सी. एनो लि. हे एनोज फ्रुटसॉल्टचे उत्पादक म्हणून प्रसिद्ध आहेत. विष्णू केमिकल कंपनी "फलक्षार" ह्या नांवानें एक क्षारयुक्त औषध विकत असे. फलक्षाराचें वेष्टन, त्याच्या बाटल्या इत्यादि फ्रुटसॉल्टच्या धर्तीवरच होत्या. एनोज फ्रुटसॉल्ट हें जगप्रसिद्ध असून "एनो" आणि "फ्रुटसॉल्ट" हे शब्द इंग्लंडमध्यें रजिस्टर करण्यांत आलेले आहेत. विष्णू केमिकल कंपनीनें फ्रुटसॉल्ट ह्या नांवाखाली—मग तें कोणत्याहि भाषेंत असो—क्षारयुक्त पदार्थ विकतां कामा नयेत, अशी तिला ताकीद देण्याबद्दल जे. सी. एनो लि. नें मुंबई हायकोर्टांत दावा आणला होता. "फ्रुटसॉल्ट" हा शब्द सर्वसाधारण क्षारयुक्त औषधांस लावतात; जे. सी. एनो लि. चा त्यावर विशेष हक्क नाहीं, असें विष्णू केमिकल कंपनीतर्फे सांगण्यांत आलें. तसेंच, "फलक्षार" हें "फ्रुटसॉल्ट"चें भाषांतर नाहीं आणि कंपनीनें वादीच्या मालाची नक्कल केलेली नाहीं, असेंहि सांगण्यांत आलें. रजिस्टर केलेल्या शब्दाचा कोणत्याहि भाषेंतील प्रतिशब्द वादीच्या मालाच्या नकलेवजा मालाचा, जनतेची फसवणूक करून, खप करण्यासाठी वापरला तर तें बेकायदा आहे, असें हायकोर्टानें मत व्यक्त केलें आणि वादीचे बाजूनें निवाडा केला. वादीस २ हजार रुपये, नुकसान भरपाई आणि दाव्याचा खर्च म्हणूनहि देवविले.

---

### विमानांतून प्रवास

एअर सर्व्हिसेस ऑफ इंडिया लि. च्या विमानांतून मुंबई-काठेवाडचा प्रवास जानेवारी, १९४० मध्यें एकूण २३१ उतारूंनीं केला. टपाल, पार्सलें, वर्तमानपत्रें, इत्यादि वाहिलीं, त्यांचें वजन ३,९२३ पौंड भरलें. याच महिन्यांत मुंबई–पुणें–कोल्हापूर मार्गानें १८ उतारूंनीं प्रवास केला.

स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक–दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजंट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे
★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें
सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.
रजिस्टर्ड ऑफिस : ७५४ शुक्रवार, पुणें २ | बिझिनेस ऑफिस : ११२A सदाशिव, पुणें २
न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एससी.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
Examiner Press Building, Dalal Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

सुखाचा शोध
मिनर्व्हा १७ वा आठवडा

## भारतीय कला–वैभव प्रदर्शन

### व्यापार–वर्धन गृह

लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम पुणें या संस्थेनें "व्यापार-वर्धन गृह" या संग्रहालयाच्या भागाचें काम हातीं घेतलें आहे. कॉमनवेल्थ विमा कंपनीच्या नवीन इमारतीचा दर्शनी ४० लणी दिवाणखाना या विभागाच्या मांडणीसाठी घेतला आहे. या विभागाची मांडणी व संवर्धन डॉ. वर्डवूड यांनीं भारतीय कला–वैभवाच्या "साऊथ केन्सिंटन" येथील संग्रहालयाच्यासाठी लिहिलेल्या ग्रंथाच्या अनुरोधानें, प्रचलित कला–कौशल्यास प्राधान्य देऊन चालविण्यांत येणार आहे; व याची योजना अशी आहे कीं या "व्यापार-वर्धन गृहां"त हिंदुस्थानच्या सर्व प्रांतांतून व सर्व संस्थानांतून हस्तकौशल्यप्रधान तयार होत असलेल्या वस्तू जमविण्यांत येणार आहेत. व्यापार–संवर्धन हें या विभागाचें ध्येय आहे. तथापि दुकानदारीवर सर्वस्वी भर दिला जावयाचा नाहीं. या ठिकाणीं मांडिलेल्या वस्तूंची शिक्षण-विषयक, उत्पादन-विषयक, व्यापार-विषयक माहिती शिक्षण-संस्थेप्रमाणें सर्वांस येथून मिळेल. शाळा कॉलेजांतील विद्यार्थ्यांस भारतीय कलावैभव या विषयांवर नियतकालिक वस्तुपाठ देण्यांत येतील. ज्या उत्पादनास प्रचार व व्यापार यांचे द्वारें मदतीची अत्यंत जरूरी आहे त्यांसच प्रामुख्यानें मदत दिली जाईल. हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या मालाची किंमत व इतर माहिती देणारीं सचित्र पुस्तकें यांचा संग्रह लहानशा मोफत वाचनालयासारखा कोणासहि देशी मालाचा संदर्भ मिळावा यासाठी येथें ठेवण्यांत येईल. १८९० सालीं या संग्रहालयाचा अशा प्रकारचा एक क्रय–विक्रय भाग होता व आतां सुरू केलेला हा भाग हें त्याचेंच पुनरुज्जीवन आहे. लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम या संस्थेच्या धोरणानेंच हा विभाग चालावयाचा आहे. प्रदर्शनांशीं तुलना केल्यास पुणें औद्योगिक प्रदर्शनाच्या प्रमाणें चालणारा हा विभाग हें हस्तकौशल्यप्रधान व छोटेखानी उद्योगधंद्यांतून पैदा होणाऱ्या वस्तूंचें सर्वत्रांस मुक्तद्वार असें कायमचें प्रदर्शनच आहे. या विभागासाठी एकेका ठिकाणासाठी, एकेका प्रांतासाठी, एकेका संस्थानासाठी स्वतंत्र पोटविभाग स्थापन करण्याचें काम चालू झालें आहे. अशा प्रकारचा माल उत्पन्न करणाऱ्या ज्या कारागिरांस व संस्थांस या संस्थेचा उपयोग करून घ्यावयाचा असेल त्यांनीं लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम, पुणें या संस्थेशीं पत्रव्यवहार करावा.

### ग्रेट ब्रिटनची युद्धाची तयारी

"युद्धास सुसज्ज होण्यासाठी आम्हांस औद्योगिक आणि आर्थिक जीवनांत क्रांति घडवून आणावी लागली आहे. युद्ध चालू असेपर्यंत आणि त्यानंतर एक वर्ष सबंध ब्रिटिश साम्राज्यांतील लोकर ग्रेट ब्रिटनलाच मिळेल, अशी व्यवस्था आम्हीं केली आहे. सुमारें ११० कोटि रुपयांचें कापड आणि कातडें आम्ही घेऊन ठेवलें आहे. युद्धाचे प्रारंभीं, खाकी कापड करणारे ९ कारखाने ग्रेट ब्रिटनमध्यें होते; आतां ते १ हजारांपेक्षा ज्यास्त आहेत. शांततेच्या काळांत लष्करांतील शिपायांसाठी दरमहा २३ लक्ष वार ओव्हरकोटाचें कापड तयार केलें म्हणजे पुरत असें; आतां तें दरमहा १५ लक्ष वार लागत आहे. त्याचप्रमाणें, शांततेच्या काळीं, लष्करास दरसाल १ लक्ष, २० हजार बुटाच्या जोड्या लागतात; सध्या आम्हीं दर आठवड्यास १ लक्ष ३० हजार जोड्या बनवीत आहों. आज ग्रेट ब्रिटनमध्यें १५ लक्ष लोकांची फौज सुसज्ज आहे." वरील माहिती ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. चेंबर्लेन यांनीं आपल्या भाषणांत नुकतीच दिली.

## जपानमधून पेन्सिलींची निर्गत

१९१४ सालीं जपाननें ५६ हजार ग्रोस पेन्सिलींची निर्गत केली. महायुद्धाचे काळांत जपानी पेन्सिलींची निर्गत वाढून ती १९१७ मध्यें १८ लक्ष ग्रोसांवर गेली; १९२९ सालापासून १९३८ सालापर्यंतचे, जपानी पेन्सिलींच्या निर्गतीचे आकडे खालीं दिले आहेत:—

जपानी पेन्सिलींची निर्गत

| वर्ष | संख्या (१,००० ग्रोस) |
|---|---|
| १९२९ | ७६३ |
| १९३० | ५०० |
| १९३१ | ५८८ |
| १९३२ | १,३१७ |
| १९३३ | १,८१६ |
| १९३४ | २,००६ |
| १९३५ | २,२१५ |
| १९३६ | २,५२८ |
| १९३७ | २,६०८ |
| १९३८ | १,३९३ |

ह्या पेन्सिलींची निर्गत मुख्यतः आशिया खंडांतील देशांकडेच होते. फक्त सुमारें २५% पेन्सिली युरोप, दक्षिण अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया इकडे जातात.

निर्गत कोठें होते ?

| देश | संख्या (१,००० ग्रोस) | निर्गतीशीं एकूण प्रमाण |
|---|---|---|
| चीन | ३५८ | १९·६ |
| मॅंच्युरिया | ३३० | २४·२ |
| साउथ सी बेटें | १६० | ११·६ |
| हिंदुस्थान | १५० | ८·९ |
| ऑस्ट्रेलिया | ९३ | ५·२ |
| दक्षिण अमेरिका | ९० | ५·० |
| हॉलंड | ३८ | २·५ |
| बेल्जम | २६ | ३·१ |
| फिलिपाइन्स | २६ | १·६ |
| इंग्लंड | २३ | १·५ |
| आफ्रिका | २३ | १·६ |
| अमेरिका व कॅनडा | १७ | १·४ |
| एकूण | १,३९३ | १०० |

जपानी पेन्सिलींच्या निर्गतीस सध्याच्या युद्धपरिस्थितीमुळें पुनः चालना मिळणार आहे.

### चोरून पत्रें पाठविणारांवर खटला

इटालियन बोटींवरून बेकायदा पत्रें आणि इतर वस्तू नेण्यांत येतात, असें मुंबई पोलिस खात्यास समजल्यावरून त्यानें लक्ष ठेवून बोटीवरील अधिकाऱ्यांस एका पाकिटांतून पत्रें दिलीं जात असतां मध्यें पकडून तीं अडवलीं आणि सात युरोपियनांस त्याबाबत अटक केली. त्यांतील २३ पत्रांपैकी ७ पत्रें जर्मनीकडे, १५ पत्रें इटलीकडे व १ पत्र स्वित्सरलंडकडे रवाना करण्यासाठी असलीं होतीं. त्यांपैकी बहुतेक पत्रांतील मजकूर आक्षेप घेण्याजोगा नव्हता, परंतु एका जर्मन स्त्रीनें आपल्या मुलासाठी एक पत्र दिलें होतें, त्यांत आगबोटींची आणि फौजेची ने-आण ह्याविषयीं माहिती लिहिली होती.

वरील हकीकत पोलिस प्रॉसिक्यूटर, मि. आर. पी. ठाणावाला, यांनीं मुंबई येथील पोलिस कोर्टांत सांगितली.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | ... | ... | | ११०—९ |
| ५% ( १९४०–४३ ) लोन | ... | ... | ... | १०१—९ |
| ४% १९४३ | ... | ... | ... | १०४—४ |
| ३½% बिनमुदत | ... | ... | ... | ९१—० |
| ३½% १९४७–५० | ... | ... | ... | १०१—४ |
| ३% ( १९६३–६५ ) | ... | ... | ... | ८९—१ |
| २¾% १९४८–५२ | ... | ... | ... | ९४—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | | | ... | १०३—२ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | ... | ... | | १०२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | ... | .. | | ११०—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | ... | ... | | १२०—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | | | |
|---|---|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | ... | ... | १३६—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ... | ... | १०२—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% | | ... | ३४—० |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | ... | ... | १४९०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% | ... | ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | — ... | ... | १०१—८ |

#### वीज

| | | | |
|---|---|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% | ... | ... | १२९—८ |
| कराची ( १०० ) ९% ... | ... | ... | १८३—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | ... | ... | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | ... | ... | १३२७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | ... | ... | १४७५—० |

#### रेल्वेज

| | | | |
|---|---|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% | ... | ... | ९५—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ३½% | ... | ... | ६७—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | | | ९७५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... | ... | ... | ७५८–१२ |

#### इतर

| | | | |
|---|---|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ५ रु. ... | ... | ... | २१७—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ... | ... | ४७—० |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. ... | ... | ... | २१—६ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. | | ... | ३६–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | | ... | ४१७०–० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | ... | ... | १९२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | | ... | १३७—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ... | ... | ३६८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पे | | ... | १९३७—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु | | ... | १२२—० |




एजंटः—
**महादेव गोविंद कुलकर्णी**
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव पुणें शहर.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी**, ६७२ सदाशिव, पुणें.

हप्त्याचे अत्यंत कमी दर असलेल्या
**दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.**
ह्या महाराष्ट्रीय विमा संस्थेचा पहिल्या पंचवार्षिक मूल्यमापनाचा निर्णय

हयातींतील विम्यावर दर हजारीं ५०

हेड ऑफिस : जळगांव ( पू.खा. )
मुंबई शाखा : को–ऑपरेटिव्ह बिल्डिंग,
फेरोजशा मेथा रोड.

हयातीनंतरच्या विम्यावर दर हजारीं ६०

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its.

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you:

**NEW BUSINESS**

Last year 1937-38
Exceeds
Rs. 3 CRORES

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Office* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.
POONA OFFICE — 180, Budhwar Peth



## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.



## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. ध. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ४००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.



फर्म, कंपनी, सोसायटी

## कायदा

लेखक : श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. ( ऑनर्स ), एलएल्. बी.

"न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ८६ आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,
तुळशीबागरोड :: नागपूर शहर



## विमा—जगत्

विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.

जानेवारी १९४० पासून ३ ऱ्या वर्षास सुरुवात.
केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.
व्यवस्थापक—विमा—जगत्, पुणें २.






**स्त्रियांचा आजार** म्हणजे मुख्यतः विटाळ-दोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे मार्गदर्शन तयार केलेलें असून आज सतत १० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकाली गर्भपात, होणें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविल्यास टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

दी हेल्थ कॉरिज एजन्सीज. ( डि. मे. १ )
१५३।३ माधवविलास, विजयवाडी, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी ' गुणविकास, ' भांबुर्डा, घ. नं. १२०।१।३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.